| MHKO110003272014 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक १०३/२०१४ मधील निशाणी क्र. १०३ वरील आदेश** **( श्रीमती लक्ष्मीबाई बाबुराव खोंद्रे वगैरे विरुध्द श्री.बाजीराव बाबुराव खोंद्रे वगैरे )** |
|---|---|

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक १-ब नंदकुमार उर्फ विनोद शामराव खोंद्रे यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन असे की, प्रतिवादी क्रमांक १०-ब नंदकुमार उर्फ विनोद शामराव खोंद्रे यांचा दिनांक २६.०६.२०२१ रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूपश्चात त्यांना **१.**श्रीमती इंदुबाई शामराव खोंद्रे-आई, **२.** श्रीमती वृषाली विनोद खोंद्रे- पत्नी, **३.**कु.रुतुजा विनोद खोंद्रे- मुलगी, ४.कु.रुत्वीक विनोद खोंद्रे- मुलगा असे कायदेशीर वारस आहेत. सबब वादीने उपरोक्त वारस अभिलेखावर घेणेबाबत विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागील बाजूस सादर केले असून, प्रस्तुत प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की , वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. परंतू प्रतिवादी क्रमांक १०–ब मयत झाले आहेत व त्यांचे वारस कोण आहेत याची माहीती असतानाही जाणूनबुजून विलंब करणेच्या उददेशाने व काम चालविणेस टाळाटाळ करणेसाठी विलंबाचे अर्ज दाखल केला असलेने . सबब सदरचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

**४.** अर्ज, म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ अन्वये दाखल केलेला आहे. सदरहू नियमाप्रमाणे प्रतिवादीच्या मृत्यूपश्चात दावा चालविणेचा अधिकार अबाधित रहात असेल तर त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेची तरतूद आहे. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द दावा सरसनिरस मानाने वाटप होऊन, तुटक कब्जा मिळणेकरीता व कायम मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे. सबब दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्रमांक १०–ब यांच्या मृत्यूपश्चातदेखिल दावा चालविणेचा हक्क व अधिकार अबाधित रहातो. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्रमांक १०–ब चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे गरजेचे आहे. अर्जातील नमूद कायदेशीर प्रतिनिधी व्यतिरिक्त प्रतिवादी क्रमांक १० –ब यास अन्य प्रतिनिधी असल्याबाबत कोणताही वाद सदयस्थितीत दिसून येत नाही. तसेच सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे उपरोक्त कायदेशीर प्रतिनिधी यांना कोणतीही तोषीस लागत नाही. याउलट प्रकरण गुणवत्तेवर निकाली करणेसाठी प्रतिवादी क्रमांक १०–ब चे कायदेशीर प्रतिनिधी असणे आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आ दे श -**

**१.** अर्ज निशाणी क्र. १०३ मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी यांनी अर्जात नमुद प्रतिवादी क्रमांक १०-ब चे वारसाबाबत दाव्यात दुरुस्ती प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांचे आत करावी व वादपत्राची दुरुस्त प्रत दाखल करावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2022.11.28 11:36:14 +0530

ठिकाण – पेठवडगांव ( एस.डी.शिरसाट )

दिनांक -२३/११/२०२२ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

पेठवडगांव